# वापरासाठी सूचना


## इंजेक्शनसाठी रुसफेर्टाइड (पीटीजी-300) त्वचांतर्गत (सबक्युटेनस) वापराकरिता

या “वापरासाठी सूचना”मध्ये पीटीजी-300 कसे तयार करावे आणि इंजेक्ट करावे याबाबतची माहिती समाविष्ट आहे.
पीटीजी-300 कसे तयार करावे आणि/किंवा इंजेक्ट करावे याबाबत तुम्हाला कोणतेही प्रश्न असल्यास, कृपया तुमच्या चिकित्सीय साईटशी संपर्क साधा.

### पीटीजी-300 इंजेक्ट करण्यापूर्वी तुम्हाला माहीत असणे गरजेची असणारी महत्त्वपूर्ण माहिती

- **पीटीजी-300 तयार करण्यास सुरुवात करण्यापूर्वी व इंजेक्शनपूर्वी वापरासाठीच्या खालील सर्व सूचना वाचा.**
- केवळ औषध किटसोबत दिलेल्या सामग्रीचा (सप्लाइजचा) वापर करा.
- किटची मुदत समाप्त झालेली असल्यास किंवा कोणतीही सामग्री उघडलेली असल्यास, तिची हानी झालेली असल्यास किंवा ती गहाळ झालेली असल्यास, किटचा वापर **करू नका.** चिकित्सीय साईटशी संपर्क साधा.
- किट कक्ष तापमानाला उबदार होण्यासाठी, तुम्ही तयारी सुरु करण्यापूर्वी किमान 15 मिनिटे रेफ्रिजरेटरमधून किट बाहेर काढा.
- तुम्ही इंजेक्ट करण्याच्या प्रत्येक वेळी, तुमच्या औषध किट व्यतिरिक्त, तुम्हाला शार्प्स कंटेनर (चिकित्सीय साईटने दिलेले) गरजेचे असेल.
- व्हायल्सच्या टोकावरील करड्या रंगाच्या रबर स्टॉपरला स्पर्श **करू नका.**
- औषध मिसळल्यानंतर 4 **तासांच्या** आत इंजेक्शन द्या.
- तुमच्या हातांना किंवा कोणत्याही पृष्ठभागाला सिरिंजच्या टोकाचा किंवा सुईचा स्पर्श होऊ **देऊ नका.**
- केवळ त्वचांतर्गत (सबक्युटेनियस) इंजेक्शनसाठी (त्वचेखालील मेदयुक्त स्तरामध्ये थेटपणे इंजेक्ट करा)
- सुरक्षित हाताळणीसह, किटमधील सामग्रीची कशा प्रकारे योग्य पद्धतीने विल्हेवाट लावावी किंवा ती परत करावी याबाबत रुसफेर्टाइडची विल्हेवाट (पीटीजी-300) विभागाचा संदर्भ घ्या. सर्व सामुग्री केवळ एकदाच वापर करण्यासाठी आहे.
- न वापरलेल्या औषधाच्या कुप्या (व्हायल्स) चिकित्सीय साईटवर परत करा.

### वापरापूर्वी पीटीजी-300 साठवणूक




आकृती ए

- पीटीजी-300 किट हा रेफ्रिजरेटरमध्ये (2° ते 8°से/ 36° फॅ ते 46° फॅ.) (आकृती ए) जतन करा.
- फ्रिज करू **नका.**
- **लहान मुलांच्या हाती लागणार नाही अशा प्रकारे ठेवा.**

## स्टेप 1: सुरुवात करणे

### 1.1



आकृती बी

- तुम्ही डोस तयार करण्यास सुरुवात करण्याच्या किमान 15 मिनिटे आधी रेफ्रिजरेटरमधून किट बाहेर काढा (आकृती बी).
- स्वच्छ सपाट पृष्ठभागावर ठेवा आणि किट कक्ष तापमानाला ऊबदार होईपर्यंत **किमान 15 मिनिटे तसाच राहू द्या.**


### 1.2



आकृती सी

- साबणाने व पाण्याने हात स्वच्छ धुवा (आकृती सी)


### 1.3




आकृती डी

- किटच्या कार्टनच्या बाहेरील **मुदतसमाप्ती तारीख** तपासा (आकृती डी).
- सामग्री (सप्लाइज) **खुले आहे का, त्याची हानी झाली आहे का किंवा ती गहाळ झालेली आहे का** ते तपासा.
- किटची मुदत समाप्त झालेली असल्यास किंवा कोणतीही सामग्री उघडलेली असल्यास, तिची हानी झालेली असल्यास किंवा ती गहाळ झालेली असल्यास, किटचा वापर करू नका. चिकित्सीय साईटशी संपर्क साधा.

### 1.4




पावडर समाविष्ट असलेली पीटीजी-300 औषधाची व्हायल | डायल्यून्ट आधीच भरलेली (प्रि-फिल्ड) सिरिंज | सुई | व्हायल ॲडाप्टर

आकृती ई

- सर्व सामुग्री किटमध्ये असल्याची पुष्टी करा (आकृती ई). किटमधून वस्तू काढून स्वच्छ सपाट पृष्ठभागावर ठेवा.

**टीप:** किटमध्ये मिळणाऱ्या वस्तूंव्यतिरिक्त, तुम्हाला अल्कोहोल स्वॅब्ज आणि स्वतंत्रपणे प्रदान केलेले शार्प्स कंटेनर देखील आवश्यक असतील (आकृती एफ).




अल्कोहोल स्वॅब्ज | शार्प्स कंटेनर

आकृती एफ

# स्टेप 2: रुसफेर्टाइड (पीटीजी-300) पुन्हा जोडणे (रिकॉन्स्टिट्युटिंग)

**2.1**


जोपर्यंत तुम्ही आत पाहू शकता तोपर्यंत



आकृती जी

- संपूर्ण लेबल मागे ओढून काढा. तुम्ही पीटीजी-300 औषधाच्या व्हायलच्या आत पाहू शकाल (आकृती जी).


**2.2**



आकृती एच

- पीटीजी-300 औषधाच्या व्हायलचे झाकण काढा (आकृती एच). व्हायलचे झाकण फेकून द्या.

**2.3**




आकृती आय

- पीटीजी-300 औषधाच्या व्हायलच्या वरचे करड्या रंगाचे रबर स्टॉपर नवीन अल्कोहोल स्वॅबने स्वच्छ करा (आकृती आय).

  व्हायलच्या वरचे करड्या रंगाचे रबर स्टॉपर स्वच्छ केल्यानंतर त्याला तुमच्या हाताने स्पर्श **करू नका.**

**2.4**




आकृती जे

- व्हायल अ‍ॅडाप्टर त्याच्या पॅकेजमधून बाहेर काढा (आकृती जे).

  अ‍ॅडाप्टरच्या स्पाइकला स्पर्श **करू नका** किंवा ते पृष्ठभागावर ठेवू **नका.**

**2.5**




आकृती के

- अ‍ॅडाप्टरचा कटकन आवाज होऊन व्हायलला पूर्णपणे जोडले जाईपर्यंत ते व्हायलच्या वरच्या बाजूने सरळ खाली ढकला (आकृती के). व्हायल अ‍ॅडाप्टर कोनात जोडू **नका.**

  **टीप:** व्हायल अ‍ॅडाप्टरवरील स्पाइक करड्या रंगाच्या रबर स्टॉपरमध्ये छिद्र पाडून आत घुसवावे.


**2.6**



आकृती एल

- एका हाताने व्हायल अ्ॅडॅप्टरला धरून व्हायल अ्ॅडॅप्टरची कॅप काढा, आणि दुसऱ्या हाताने, कॅपवर उचलली जात नाही तोपर्यंत ती काउंटर-क्लॉकवाइज/डाव्या बाजूला फिरवून अनस्क्रू (सैल) करा (आकृती एल.) व्हायल अ्ॅडॅप्टर कॅप टाकून द्या. व्हायल अ्ॅडॉप्टरच्या टोकाला स्पर्श **करू नका.**

**2.7**




आकृती एम

- आधीच भरलेल्या डायल्युन्ट सिरिंजचे झाकण घड्याळाच्या उलट्या दिशेने (काउंटर-क्लॉकवाईज)/डावीकडे फिरवून ते वर येईपर्यंत अनस्क्रू (सैल) करा (आकृती एम). सिरिंजचे झाकण फेकून द्या.

  आधीच भरलेल्या सरिजिच्या उघड्या टोकाला स्पर्श **करू नका.**

**2.8**




आकृती एन

- व्हायलला धरून आणि तुम्हाला प्रतिरोध जाणवेपर्यंत क्लॉकव्हाइज/उजव्या बाजूला फिरवून व्हायल अ्ॅडॅप्टरवर सिरिंज घट्ट फिरवून सिरींज पीटीजी-300 व्हायल अ्ॅडॅप्टर जोडा (आकृती एन).

  खूप जास्त घट्ट **करू नका.**

पुढील पृष्ठावर चालू ठेवा

**2.9**




आकृती ओ

- पूर्णपणे खाली जाईपर्यंत सिरिंजचा प्लंजर **हळूहळू** खाली ढकलून डायल्युएन्ट औषधाच्या व्हायलमध्ये इंजेक्ट करा (आकृती ओ).

**2.10**

60 सेकंद हळूहळू फिरवा



आकृती पी


- **कमीतकमी 60 सेकंद** औषधाची व्हायल हळूहळू आणि सौम्यपणे फिरवून डायल्युन्ट आणि औषध मिसळा (आकृती पी). औषध फेसाळ स्वरूपात दिसू शकते.

  हलवू नका.

  टीप: औषध मसिळल्यानंतर4 **तासांच्या** आत इंजेक्शन द्या.

**2.11**


व्हायल 60 सेकंद स्थिर ठेवा



आकृती क्यू

- व्हायल एका स्वच्छ सपाट पृष्ठभागावर ठेवा आणि द्रव स्थिर होण्यासाठी आणि फेसाळपणा जाण्यासाठी **किमान 60 सेकंद तशीच राहू द्या (आकृती क्यू).**

**2.12**




आकृती आर

- एकदा का द्रव स्थिर झाला की मग द्रव तपासा (आकृती आर). ते थोड्याशा फेसासह स्पष्ट, रंगहीन आणि दिसणाऱ्या कणांपासून मुक्त असावे.

  द्रव रंगीत दसिल्यास किंवा त्यात कण असल्यास व्हायल वापरू **नका.**

## स्टेप 2: रुसफेर्टाइड (पीटीजी-300) पुन्हा जोडणे (रिकॉन्स्टिट्युटिंग) पुढे चालू


**2.13**



आकृती एस

- प्लंजर पूर्णपणे खाली दाबला गेला आहे याची खात्री करा कारण मिसळताना प्लंजर वर आलेला असू शकतो (आकृती एस).


**2.14**



आकृती टी

- उलटे फिरवा जेणेकरून पीटीजी-300 औषधाची व्हायल आता वर असेल (आकृती टी).

**2.15**



आकृती यु

- प्लंजर हळूहळू खाली खेचून मिसळलेले सर्व औषध सिरिंजमध्ये ओढा (आकृती यु). व्हायलमध्ये द्रवाचे काही थेंब राहणे सामान्य आहे.

**काळजी घ्या,** प्लंजर रॉड सरिंजिमधून बाहेर काढू **नका.**

**टीप:** द्रव ओढून घेतल्यानंतर सरिंजिमध्ये एअर गॅप / बुडबुडे असणे सामान्य आहे.

**2.16**





आकृती व्ही

- सिरिंज एका हाताने धरून, व्हायल अॅडॅप्टर पकडा आणि काउंटर-क्लॉकव्हाइज/डाव्या बाजूला वळवून भरलेल्या सिरिंजमधून व्हायल असेम्ब्ली (व्हायल आणि व्हायल अॅडॅप्टर) वेगळी करा (आकृती व्ही).

रिकामी व्हायल शार्प्स डिस्पोजल कंटेनरमध्ये किंवा चिकित्सीय साईटच्या सूचनेनुसार फेकून द्या


**2.17**



आकृती डब्ल्यू

- भरलेली सिरिंज ही स्वच्छ सपाट पृष्ठभागावर बाजूला ठेवा. तुमच्या हातांना किंवा कोणत्याही पृष्ठभागाला सिरिंजच्या टोकाचा स्पर्श होण्याला प्रतिबंध करा (आकृती डब्ल्यू).

**2.18**




आकृती एक्स

- पॅकेजिंगमधून सुई काढा (आकृती एक्स).

सुईच्या तळाला/खुल्या टोकाला स्पर्श **करू नका.**


**2.19**



आकृती वाय

- सिरिंज एका हाताने धरा, तुम्हाला प्रतिरोध जाणवेपर्यंत क्लॉकव्हाइज/उजव्या बाजूला वळवून सिरिंजवर सुई घट्ट करा (आकृती वाय).

**2.20**




आकृती झेड

- तयार केलेली सिरिंज स्वच्छ सपाट पृष्ठभागावर बाजूला ठेवा (आकृती झेड).

## स्टेप 3: इंजेक्शनची जागा तयार करणे

**3.1**

पुढील दृश्य




आकृती एए

- इंजेक्शन देण्यासाठी शिफारस केलेली पुढीलपैकी एक जागा निवडा (आकृती एए):
  - **ओटीपोट** (नाभीपासून [बेली बटनपासून] किमान 2 इंच दूर)
  - **मांडीचा मध्य भाग**
  - तुम्ही इंजेक्शन तयार करणारे व प्रदान करणारे देखभालप्रदाता असल्यास, तुम्ही गरजेचे असल्यास रुग्णाच्या बाहूच्या वरच्या भागातील बाहेरील क्षेत्राचा देखील वापर करू शकता.

जेथे त्वचा संवेदनशील आहे, काळी-निळी झालेली आहे, लालसर, दाहयुक्त, कठीण झालेली आहे किंवा कापली गेलेली आहे त्या जागेची निवड **करू नका.**

सलग दोनदा एकाच जागी इंजेक्ट **करू नका.** इंजेक्शन्सदरम्यान जागा बदलत राहा. गरजेचे असल्यास तुमच्या इंजेक्शनच्या जागांबाबत लिहा किंवा लॉग करा.

**3.2**




आकृती एबी

- इंजेक्शनची निवडलेली जागा नवीन अल्कोहोल स्वॅबने स्वच्छ करा (आकृती एबी). वापरलेल्या स्वॅबची विल्हेवाट लावा.
- हवेवर कोरडी होऊ द्या.

## स्टेप 4: रुसफेर्टाइड (पीटीजी-300) इंजेक्ट करणे


### 4.1



आकृती एसी

- गुलाबी नीडल शील्ड मागे ओढा (आकृती एसी).


### 4.2



आकृती एडी

- सिरिंज एका हाताने धरून आणि दुसऱ्या हाताने **कॅप** घट्टपणे **सरळ ओढून** नीडल कॅप काढा (आकृती एडी).
- तुम्ही कॅप ओढत असताना तुमचा हात सुईपासून दूर ठेवा जेणेकरून तुम्हाला सुई टोचणार नाही.

### 4.3




आकृती एई

- **सिरिंजमधून हवा काढा (आकृती एई).** हे करण्यासाठी:
  - सुईचे टोक सरळ वरच्या बाजूला राहील अशा प्रकारे सिरिंज धरून ठेवा.
  - कोणतीही हवा किंवा बुडबुडे सिरिंजच्या टोकावर जाण्यासाठी सिरिंजला टॅप करा.
  - हवा किंवा बुडबुडे काढण्यासाठी सिरिंजचा प्लंजर **सावकाशपणे** व **काळजीपूर्वक** ढकला. सुईच्या टोकाशी द्रवपदार्थ दिसून आल्यावर प्लंजर ढकलणे थांबवा.
  - 1 ते 2 थेंबांपेक्षा अधिक द्रवपदार्थ बाहेर पडू नये. सिरिंजमध्ये थोडीशी एअर गॅप/बुडबुडे राहिल्यास ते चालू शकते.


### 4.4

- इंजेक्शन देण्याच्या जागेवर त्वचेला चिमटीत धरण्यासाठी एका हाताचा वापर करा (आकृती एएफ). यामुळे तुम्हाला अगदी त्वचेखालील मेदयुक्त ऊतीमध्ये सुई घुसवणे शक्य होते.



आकृती एएफ


### 4.5




आकृती एजी

- चिमटीत धरलेल्या त्वचेमध्ये 45-90 अंश कोनामध्ये सुई घुसवा (आकृती एजी).
- नंतर चिमटीत घेतलेली त्वचा सोडा.

### 4.6




आकृती एएच

- **सर्व पीटीजी-300 औषध इंजेक्ट करण्यासाठी प्लंजर सावकाशपणे ढकला** (आकृती एएच).
- सर्व द्रवपदार्थ इंजेक्ट केल्यानंतर, सुई आणि सिरिंज त्वचेच्या बाहेर त्याच कोनात खेचा ज्या कोनात तुम्ही घातले होते.

## स्टेप 5: रुसफेर्टाइडची विल्हेवाट (पीटीजी-300)


### 5.1



आकृती एआइ

- सुईवर गुलाबी नीडल शील्ड घट्ट बसेपर्यंत आणि सुईला झाकेपर्यंत ती काळजीपूर्वक ढकला (आकृती एआइ).

### 5.2



आकृती एजे


- वापरलेली सिरिंज ही लगेचच शार्प्स कंटेनरमध्ये ठेवा (आकृती एजे).

  तुमच्या घरगुती कचऱ्यामध्ये सुई व सरिंजि फेकू नका.

  सुई व सरिंजि यांचा पुनर्वापर करू **नये.**

  शार्प्स कंटेनर हा नेहमी मुलांच्या हाती लागणार नाही अशा प्रकारे ठेवा.

### 5.3




आकृती एके

- **रिकामे कार्टन्स चिकित्सीय साईटवर परत करा** (आकृती एके).
- **रिकामी व्हायल शार्प्स डिस्पोजल कंटेनरमध्ये** किंवा चिकित्सीय साईटच्या सूचनेनुसार **फेकून द्या**
- **इतर साहित्य घरातील कचऱ्यात टाका.** वापरलेल्या सिरिंजची झाकणे, वापरलेल्या कुप्यांची (व्हायल्सची) झाकणे, वापरलेल्या व्हायल अॅडाप्टरची झाकणे, वापरलेले अल्कोहोल स्वॅब्ज आणि उघडलेले पॅकेजिंग यांची घरगुती कचऱ्यात विल्हेवाट लावली जाऊ शकते.

### अतिरिक्त माहिती

- **पीटीजी-300 कशा प्रकारे वापरावे याबाबत अधिक माहितीसाठी, चिकित्सीय साईटशी संपर्क साधा.**